MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

# साहित्यातून अभिव्यक्त होणारा मातृहृदयाचा माणूस : साने गुरुजी

– प्रा. संग्राम सीताराम गोसावी

'मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र' अशा शब्दात प्र.के.अत्रे यांनी ज्या पुस्तकाची प्रस्तावना केली आहे, जे पुस्तक प्रत्येक मराठी भाषिकाने आपल्या उभ्या आयुष्यात एकदा तरी वाचलेले आहे अशा सुप्रसिद्ध अशा 'श्यामची आई' या पुस्तकाचे लेखक पांडुरंग सदाशिव साने अर्थात महाराष्ट्राचे लाडके साने गुरुजी हे खरे तर मराठी साहित्यविश्वातले एक मैलाचा दगड म्हणून ओळखले जातात ते त्यांच्या साहित्यविश्वातील संवेदनशील लेखनामुळे !

'श्यामची आई' या पुस्तकामुळे 'साने गुरुजी' हे नाव आज घरोघरी पोहोचलेले आपण पाहतो आहोत. परंतु 'श्यामची आई' पुरतेच साने गुरुजी यांना सीमित न ठेवता गुरूजींच्या समग्र साहित्याचा आढावा आपण घेतला तर आपल्या असे लक्षात येईल की, गुरुजींनी बालकांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येक व्यक्तिमत्वासाठी लिखाण केले आहे. त्यांच्या लिखाणात देश, समाज, राष्ट्र, संस्कृती, धर्म, पंथ, निसर्ग या सर्वांचा मुक्तहस्ते समावेश झालेला आपणास पहावयास मिळतो. खरे पाहता कोकणातल्या 'पालगड'सारख्या एका छोट्याश्या खेड्यात जन्माला आलेले गुरुजी आणि त्यांच्या लिखाणातली त्यांची प्रतिभाशक्ती पाहता प्रत्येक वाचकास असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे की, एका छोट्या खेड्यातून आलेली ही व्यक्ती इतकी प्रतिभावंत कशी असू शकते ? याचे उत्तर आपण जेव्हा शोधावयास जातो तेव्हा याचे उत्तर आपणास मिळते ते 'शामच्या आई'मध्ये ! बालपणापासूनच लहानग्या श्यामवर त्यांच्या आईने यशोदाबाईने केलेले संस्कार. ही आईने दिलेली संस्काराची शिदोरी लहानग्या श्यामला आयुष्यभर उपयोगी पडली. या संस्काररुपी शिदोरीतूनच गुरुजींचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. 'तृणाची थोरवी' हा गुरुजींचा ललितगद्यात्मक लघुनिबंध वाचताना वाचक अक्षरशः त्या विषयात गुंतून जातो. खरेतर तृण म्हणजे गवत. आपल्या आजूबाजूला यत्र तत्र सर्वत्र आढळणारा एक निसर्गातील घटक. ज्याच्याकडे आपले फारसे लक्ष जात नाही. परंतु गुरुजींनी 'तृणाची थोरवी' या आपल्या लघुनिबंधातून तृणाची थोरवी वर्णन करताना या तृणाचे विविध प्रकार, विविध छटा, विविध उपयोग सांगितले तर आहेतच, परंतु

या निबंधातून गुरुजींनी सगळ्यात महत्वाची गोष्ट केली ती म्हणजे मूल्यसंस्कार!

'तृणाची थोरवी' मध्ये गुरुजी एके ठिकाणी म्हणतात, बा तृणा! परमेश्वराच्या अपरंपार वैभवाचे यशोगान करणारा तू मुळात कवी आहेस! परमेश्वराच्या अस्तित्वाचे सिद्धांतस्वरूपी समर्थन करणारा तू संयतवाक् तत्वज्ञ आहेस. तू बोलत नाहीस, परंतु कधी कधी तू हसतोस व रडतोस. त्या स्मिताने व त्या अश्रुने तुझ्या मनातील भाव चटसारे कळतात. तू बोलत नाहीस, पण तुझ्या अबोलण्यानेच हजारो गोष्टी समजून येतात. तुझे मुकेपण म्हणजे सागराचे वक्तृत्व आहे, मेघांचे गंभीर गर्जन आहे. तुझ्या मुकेपणात मोठी शक्ती आहे. बोलून कोणीही दाखवील, परंतु बोलण्यासारखे जवळ असूनही मौन धरणे थोर होय. बोलून दाखविण्यापेक्षा, प्रकटीकृत वाग्वैभवापेक्षा गुप्त व अदृश्य वाग्वैभव कधी कधी श्रेष्ठ असते.

तृणासारख्या निसर्गातल्या अगदी लहानातल्या लहान आणि नेहमीच दुर्लक्षित असणाऱ्या घटकाकडून शिकण्यासारखी सगळ्यात महत्वाची गोष्ट ! मनुष्याला यशस्वी आणि सुखी आयुष्य जगायचे असेल तर कुठे बोलायचे आणि कुठे शांत राहायचे हे त्याला समजणे आवश्यक आहे. गवतासारख्या एका शुल्लक घटकाकडून हा मुल्यभाव माणसाला शिकता येण्यासारखा आहे. हे झाले उदाहरणादाखल . संपूर्ण निबंधात गुरुजींनी अतिशय सुलभ, सोप्या भाषेत या तृणाच्या अंगी असणाऱ्या विविध गुणांचे विवेचन केले आहे. ललितगद्य लघुनिबंधातील एक उत्तम साहित्यकृती म्हणून आपणास गुरुजींच्या ' तृणाची थोरवी ' या निबंधाकडे पाहता येईल.

गुरुजींनी कुमारांसाठी, तरुणांसाठी विविध कादंबऱ्या लिहिल्या. यामध्ये 'आस्तिक', 'क्रांती', 'पुनर्जन्म', 'सती', 'धडपडणारी मुले', या कादंबऱ्यांची नावे आपणास घेता येईल. नाशिकच्या तुरुंगात कारावासात असताना गुरुजींनी 'आस्तिक' ही कादंबरी लिहिली. जनमेजय राजाचे सर्पसत्र आणि आस्तिक ऋषी यांच्या पौराणिक कथेचा रूपकात्मक उपयोग करून सकाळ मनुष्यजातीच्या ऐक्याची, समतेची, बंधुभावाची व्यापक दृष्टी गुरुजींनी या कादंबरीच्या माध्यमातून व्यक्त केली आहे.

साने गुरुजींच्या कादंबऱ्याबद्दल भाष्य करताना मराठीतील सुप्रसिद्ध लेखिका कुसुमावती देशपांडे आपल्या ' मराठी कादंबरीचे पहिले शतक ' या ग्रंथात म्हणतात, त्यांचे हे शब्द त्यांच्या लेखनातील व जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण लीनतेचे जसे द्योतक आहे, तसे भावूक स्वप्नरंजनाचेही. मात्र हे स्वप्नरंजन कार्यविषयक आकांक्षेतून स्फुरलेले आहे. सुखवादातून नाही. त्यात बौद्धिकता नाही, पण व्यापक समाजहिताच्या दृष्टीने ज्या मुल्यांची निकड आह, त्या मुल्यांची जाणीव तेथे व्यक्त झाली आहे. ही मुल्ये विशेष अभिनव आहेत असे नाही, किंवा केवळ

गांधीवादी आहेत असेही नाही. अति सनातनी धर्ममार्तंड तर सर्वसाधारण समाजाला मान्य झालेली अशीच ती आहे. ही मुल्ये उत्कट भावनापूर्णतेने वाढाळू मुले व त्यांचे मार्गदर्शन करणारे त्यागवृत्ती उदारचरित गुरुजन यांच्या कथांच्या सहाय्याने साकार करण्याचा प्रयत्न करणे हेच सान्यांच्या लेखनाचे मुख्य कार्य आहे.

लघुनिबंध, ललितगद्य, कादंबरी, अनुवाद, काव्य, पत्रे अशा विविध साहित्याप्रकारांतून गुरुजींनी विपुल आणि सकस दर्जाचे लेखन केले आहे. तत्कालीन कालखंडात भारतीय स्वातंत्र्यलढ्याने जोर पकडलेला होता. गांधीजींच्या तत्वज्ञानाचा प्रभाव गुरुजींच्या मनोवृत्तीवर प्रचंड होता. या प्रभावातूनच गुरुजींनी विविध नियतकालिकांमधून लेखन केलेले आहे. यामध्ये 'भारत', 'काँग्रेस', 'कर्तव्य' या नियतकालिकांचा उल्लेख करावा लागेल. गुरुजींनी १५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना' हे साप्ताहिक सुरू केले. हे साप्ताहिक आजही गुरुजींच्या विचारसरणीच्या प्रचाराचे आणि प्रसाराचे कार्य करत आहे.

गुरुजींनी अध्यापनानंतरचा आपला बराचसा काळ हा स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यात व्यतीत केला. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव गुरुजींच्या कृतीतही येथे आपल्याला प्रकर्षाने जाणवतो. गांधीजीनी दिलेल्या अहिंसेच्या आणि सत्याग्रहाच्या मार्गावरून गुरुजींनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही मोलाचे योगदान दिलेले आहे. गुरुजींच्या व्यक्तीमत्वात सत्य, अहिंसा, शांतता, यांचा आग्रह आणि सामंजस्य प्रस्थापनेसाठी धडपड या गांधीवादी विचारांचा प्रभाव पूर्णपणे मुरलेला होता. या विचारसरणीतूनच गुरुजींनी 'आंतरभारती' चे स्वप्न पाहिले होते. गुरुजींनी महाराष्ट्रात एक महत्वाचा सत्याग्रह केला होता तो म्हणजे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरीजनप्रवेशासाठी केलेले आंदोलन. या आंदोलनात शेवटी गुरुजींनी दहा दिवसाचे आमरण उपोषण केले होते. गुरुजींच्या या आंदोलनाला यश मिळून जेव्हा हे मंदिर सर्वांसाठी खुले झाले तेंव्हा महात्मा गांधीनी पंढरपुरचे पुरातन आणि प्रसिद्ध विठ्ठल मंदिर इतर हिंदुप्रमाणे हरीजनांसाठीही खुले झाले आहे याचे खास श्रेय साने गुरुजीना आहे. असे गौरोवोद्‌गार काढले होते.

आपल्या संपूर्ण आयुष्यात समाजाचे सर्वांगीण परिवर्तन झाले पाहिजे याविषयी गुरुजी अखंड प्रयत्नशील होते. आत्यंतिक सदाचारावर त्यांचा भर होता आणि सदाचार म्हणजे दुसऱ्याला तीळमात्रदेखील तसदी पडू नये असे वागणे.

जीवनभर आपल्या साहित्यातून आणि कृतीतून मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या साने गुरुजीना विनम्र अभिवादन !

**संदर्भ –**

१) राजा मंगळवेढेकर, साने गुरुजींची जीवनगाथा, साधना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७५

२) यदुनाथ थत्ते, साने गुरुजी जीवन ह्व परिचय, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९५६
३) कुसुमावती देशपांडे, मराठी कादंबरीचे पहिले शतक, द्वितीयावृत्ती, १९७५
४) साने गुरुजी, श्यामची आई, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे- ३० ४३ वी आवृत्ती -२००४
५) संपा. विलास खोले, साने गुरुजींचे निवडक निबंध, प्रतिमा प्रकाशन, पुणे,